PIRENS LONI Bk.
Inward No. 425
Date 24.10.2023
Section ...

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निवि/232 दिनांक : ३० सप्टेंबर २०२३

## प्रकटन

## युवा गौरव पुरस्कार २०२३—२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून खालील नमूद क्षेत्रांमध्ये राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि ४० वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वय असलेल्या या विद्यापीठाच्या पदवीधर युवक व युवतींना 'युवा गौरव' पुरस्काराने विद्यापीठाच्या वर्धापन दिनी सन्मानित करण्यात येते.

१) कला (सर्व प्रकारच्या कला उदा. ललित कला, प्रयोगजीवी कला इत्यादी)
२) क्रीडा
३) साहित्य
४) संशोधन
५) सामाजिक कार्य

या पुरस्कारांचे स्वरूप मानपत्र व रू.२५,०००/-(रू. पंचवीस हजार) चा धनादेश असे असून जास्तीत जास्त चार सुयोग्य युवक/युवतींची निवड या पुरस्कारांसाठी करण्यात येईल.

सदर पुरस्कारासाठी पात्रता खालीलप्रमाणे आहे.

१. युवक/युवती भारताची नागरिक असणे आवश्यक आहे
२. युवक/युवतीचे वय ४० वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे
३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये/परिसंस्था/विद्यापीठ विभाग येथून पदवी किंवा पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे.
४. उपरोक्त नमुद पाच क्षेत्रांपैकी किमान एका क्षेत्रामध्ये राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी केलेली असणे आवश्यक आहे.

'युवा गौरव पुरस्कार' हा राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार म्हणून ओळखला जातो. या पुरस्कारासाठी पात्र व सुयोग्य व्यक्तींच्या नावांची शिफारस करण्यासाठी विद्यापीठाने शोध समिती घटीत केलेली आहे.

'युवा गौरव पुरस्कारासाठी' योग्य व पात्र व्यक्तींच्या नावांची शिफारस करण्यासाठी घटीत केलेल्या शोध समिती कडून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शिक्षण संस्था, प्राचार्य आणि उपरोक्त नमूद पाच क्षेत्रातील नामवंत व्यक्तींकडून नामनिर्देशने मागविण्यात येत आहेत.



Scanned with OKEN Scanner